# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन**

दिनांक 01 मे 2024 रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत "रक्त दान हे श्रेष्ठ दान" या सुविचाराला प्रतिसाद देत रामदेव पार्क, बुद्धविहार येथे रक्तदान तसेच विविध आरोग्य तपासणी शिबिरचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे व महापालिका विभागप्रमुख, कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

रक्त तपासणी, डायबेटिज, रक्तदाब, फुफ्फुसांची तपासणी यासारख्या विविध आरोग्यदायी तपासणी शिबिराचे आयोजन सार्वजनिक आरोग्य विभाग वैद्यकीय अधिकारी डॉ. बी. टी. दुधभाते यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. "रक्त दान हे श्रेष्ठ दान" या सुविचाराला जोपासत मा. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, महापालिका विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी वृंद व स्थानिक नागरिक यांनी रक्तदान करून महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. सदर शिबिराचे उत्कृष्टपणे आयोजन केल्याने मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाचे सर्व स्तरावर कौतुक केले व महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.